महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

# पक्षीमित्र

■ वर्ष सहावे ■ अंक २ रा ■ संपादक : दिगंबर गाडगीळ ■ १ जानेवारी २०१६ पाने-१०

## संपादकीय

## बर्ड रेस

हिवाळ्यामध्ये स्थलांतरित पक्षी मोठ्या संख्येने येतात. त्यामुळे पक्षीनिरीक्षकांच्या खेपा खास करून जलाशयांकडे वळतात. दरवर्षी जानेवारीत हिवाळी पक्षीगणना होते. याच सुमारास काही ठिकाणी बर्ड रेस आयोजित केली जाते. ४/६ जणांचे गट करून ठराविक वेळात जो गट जास्तीत जास्त पक्षी/जाती नोंदवील त्याचा गौरव केला जातो. काही बक्षीसही दिले जाते. यामध्ये जास्तीत जास्त लोकांनी पक्षी निरीक्षणाकडे वळावे, असा चांगला उद्देश असला तरी काही वेळा त्यामुळे अयोग्य गोष्टी होतात, होण्याची शक्यता असते. एक म्हणजे जास्तीत जास्त स्कोअर करण्याच्या हव्यासात संथपणे व काळजीपूर्वक निरीक्षण व नोंदी केल्या पाहिजेत, ते घडत नाही. पुष्कळदा नीट अवलोकन न झाल्याने अंदाजाने नोंदी केल्या जातात. काही वेळा पक्ष्याची नीट ओळख न होताच जे पाहिल्यासारखे वाटते त्याची नोंद केली जाते. काही करून सुटा पुढे व स्कोअर वाढवा हा उद्देश राहतो. टीपमध्ये नवखे पक्षीनिरीक्षक असतील तर असा प्रकार होण्याची अधिक शक्यता असते. सर्वांजवळ चांगल्या दुर्बिणी असतातच असे नाही. त्यामुळे संदिग्धता आणखीच वाढू शकते.

स्पर्धा म्हटली की ती 'येन केन प्रकारेण आपणच जिंकायची' यातून अनिष्ट गोष्टी घडू शकतात. काही निर्बंधित ठिकाणी तेथील कर्मचाऱ्यांवर दबाव टाकून नियम मोडायला बाध्य केले जाते.

दोन-तीन वर्षांपूर्वी बेंगलुरूजवळच्या हेसरगट्टा येथील गवताळ क्षेत्रावर छायाचित्रणाच्या हव्यासापायी निष्काळजीपणे वाहने हाकून तेथील वनस्पती व प्राणीजीवनाला धोका पोहचविल्याची घटना समोर आली होती. एवढेच काय आपल्या महाराष्ट्रात बर्ड रेसच्या ओघात दिवसा उजेडी लपून बसलेल्या घुबडांना थेट अभयारण्यातल्या स्थानी डिवचले गेल्याचा प्रकार घडला होता.

याचा अर्थ सगळेच पक्षी निरीक्षक निष्काळजीपणे वागतात, असे नाही. पण काही जण अतिउत्साहाच्या भरात नको त्या गोष्टी करतात. त्या न करता, स्पर्धा लावण्याच्या फंदात न पडता, छान व निवांतपणे पक्षीनिरीक्षणाचा आनंद घ्यावा.

– दिगंबर गाडगीळ

३९, आनंदवन कॉलनी, कॉलेज रोड, नाशिक – ४२२००५

स्थिरभाष : (०२५३)२५७७९६८, चलभाष : ९८८१०७९७११, E-mail : dgadgil09@gmail.com

**पक्षीमित्रच्या संदर्भातील पत्रव्यवहार, लेख संपादकांकडे पाठवावा. प्रशासकीय बाबींबद्दल मात्र चिपळूणच्या पत्त्यावर लिहावे.**

---

## अध्यक्षीय

महाराष्ट्र पक्षीमित्रचा हा अंक म्हणजे संघटनेने एक पुढे टाकलेले पाऊल म्हणता येईल. प्रथमच या त्रैमासिकासाठी पक्षीमित्रांनी पुढाकार घेऊन निधी उभा केला असून या निधीमधून सदर अंकाचा व पोस्टाचा खर्च केला जात आहे. अभिनंदन!

मला वाटते, आता आपण याच्याही पुढे जाऊन त्रैमासिक अंकासाठी कायम निधी उभा करण्याचे ध्येय ठेवूया व त्या निधीच्या व्याजातून अंक प्रकाशित होत राहील, असे पाहूया.

येत्या एक वर्षात पाच लाख रुपये एवढा निधी उभा करूया.

संस्थेचे ८४० सभासद आहेत. प्रत्येकाने या वर्षभरात फक्त एक हजार रुपये देणगी जमा करावी. अगदी ढोबळ हिशेब केला तरी सहज पाच लाख जमा होतील. आता संस्थेला ८०-जी प्रमाणपत्र मिळाले आहे.

चला तर त्रैमासिक अंक निधी जमवूया.
मिळून सारेजण करू द्विजगण रक्षण.


– भाऊ काटदरे

९३७३६१०८१७

**टीप : हा अंक आपल्या मित्रांपर्यंत पोहचवा, ते सभासद होतील !**

# ‘ब्लू मोरमॉन’ राज्य फुलपाखरू घोषित

आपल्या देशाची काही मानचिन्हे आहेत ज्यामध्ये राष्ट्रीय प्राणी वाघ, राष्ट्रीय पक्षी मोर यांचा समावेश आहे. याच धर्तीवर प्रत्येक राज्याची काही स्वतंत्र अशी मानचिन्हे आहेत. त्यानुसार महाराष्ट्राच्या मानचिन्हांमध्ये राज्य प्राणी म्हणून शेकरू, राज्य पक्षी हरियल, राज्य वृक्ष आंबा व राज्यफुल जारूळचा समावेश आहे. या मानचिन्हांच्या यादीमध्ये नुकतीच एकाची भर पडली आहे. महाराष्ट्र शासनाच्या राज्य वन्यजीव मंडळाने जून २०१५ मध्ये पार पडलेल्या बैठकीमध्ये राज्य फुलपाखरू म्हणून ‘ब्लू मोरमॉन’ या फुलपाखराला घोषित केले. विशेष म्हणजे अशा प्रकारचे राज्य फुलपाखरू घोषित करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे. या निमित्ताने महाराष्ट्राने निसर्गातील फुलपाखरू या छोट्याशा घटकाचं महत्त्व अधोरेखित केलं असून वन्यजीव संवर्धनामध्ये वाघ व इतर मोठ्या प्राण्यांसोबतच छोटे प्राणीसुद्धा महत्त्वाचे आहेत, हा संदेशच यामधून दिला आहे. आता महाराष्ट्राप्रमाणेच इतरही राज्ये या निर्णयाचं अनुकरण करतील, अशी अपेक्षा करायला हरकत नाही.



राज्याच्या मानचिन्हांवर चर्चा करण्याचा योग आम्हाला सर्वप्रथम आला तो २००९ मध्ये, अमरावती येथे झालेल्या ११व्या विदर्भ पक्षीमित्र संमेलनादरम्यान. यावेळी राज्याचा राज्य पक्षी म्हणून हरियाल ऐवजी रानपिंगळा करावा असा ठराव डॉ. राजू कसंबे व मी इतर अनेक पक्षीमित्रांच्या साक्षीने मांडला व पुढे बी.एन.एच.एस. या संस्थेने या विषयास पाठबळ दिले व हा प्रस्ताव राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीसमोर गेला. त्यावर बरीच उलटसुलट चर्चा झाली. पण तो प्रस्ताव मान्य होऊ शकला नाही.

मी स्वतः फुलपाखरांवर पीएच.डी.साठी संशोधन केले असल्यामुळे फुलपाखरू अभ्यासकांसमवेत वेळोवेळी विविध विषयांवर चर्चा होत असते. वनाधिकारी डॉ. विलास बर्डेकर हे सुद्धा फुलपाखरू अभ्यासक असून सध्या राज्य जैवविविधता मंडळाचे अध्यक्ष आहेत. त्यांचे समवेत झालेल्या एका चर्चेदरम्यान महाराष्ट्राचे राज्य फुलपाखरू असायला हवे, असा विचार समोर आला. पुढे मी कुठल्या राज्याने असे फुलपाखरू घोषित केले आहे काय? याविषयी माहिती घेतली. तेव्हा फुलपाखराला राज्य फुलपाखरू घोषित करण्याचा कुणी विचारच केला नसल्याचे दिसून आले.

राज्य फुलपाखरू म्हणून कुठले फुलपाखरू असावे, यावर आमची चर्चा झाली व ‘ब्लू मोरमॉन’ फुलपाखराला राज्य फुलपाखरू म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव आम्ही राज्य शासनाकडे जानेवारी २०१५ मध्ये पाठविला व त्यावर जूनमध्ये झालेल्या बैठकीत चर्चा होऊन राज्याचे राज्य फुलपाखरू घोषित झाले. हा प्रस्ताव मी व डॉ. बर्डेकरांनी दिला असल्याने त्याचा विशेष आनंद झाला व समाधानही वाटले.

ब्लू मोरमॉन हे काळ्या-निळ्या रंगाचे फुलपाखरू असून त्याच्या मागच्या व पुढच्या दोन्ही पंखाच्या जोड्यांवर निळे चमकदार पट्टे व मागील पंखांच्या निळ्या रंगावर काळ्या खुणा असतात. पंखांच्या खालील बाजूस शरीराकडे लाल रंगाचे ठिपके असतात. याचा आकार भारतातील सर्वात मोठ्या आकाराचे फुलपाखरू ‘सदर्न बर्ड विंग’च्या खालोखाल असून याचा पंखविस्तार जवळपास १५ सें.मी. एवढा असतो. विविध संदर्भ पुस्तकांनुसार याचे मराठी नाव राणी पाकोळी, निळपंख पाकोळी, निलपंख आहे. राज्य फुलपाखरू झाल्याने त्याची समर्पक अशी ओळख देण्यासाठी आम्ही मराठी नाव ‘निलपंख’ असे सुचविले आहे. ब्लू मोरमॉन हे फुलपाखरू महाराष्ट्रातील पश्चिम घाट म्हणजेच सह्याद्री पर्वतरांगा व मुंबईमध्येसुद्धा चांगल्या संख्येत आढळत असून विदर्भातील ताडोबा, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, चिखलदरा आदी ठिकाणी तुरळकपणे आढळते.

या फुलपाखराच्या खाद्य वनस्पतींमध्ये संत्रावर्गीय वनस्पतींचा समावेश असून यामध्ये जंगली निंबू, जंगली संत्रा इत्यादी प्रकारातील वनस्पतींचा समावेश आहे. राज्य फुलपाखरू घोषित झाल्यानंतर कुणीतरी सोशल मिडियामधून हे फुलपाखरू संत्रा बागांसाठी घातक असल्याची अफवा पसरविण्याचा प्रयत्न केला. त्याची दखल एका वृत्तपत्रानेही घेतल्याने निसर्गप्रेमीच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. त्यावर वृत्तपत्रातून हे फुलपाखरू संत्र्याच्या किडीच्या यादीत समाविष्ट नसल्याचे मी सविस्तरपणे मांडले. संत्र्याच्या किडींच्या यादीमध्ये शेकडो कीटकांचा समावेश असून त्यामध्ये फक्त लाइम बटरफ्लाय (Lime Butterfly or Lemon Butterfly - Papilio demoleus) या एकाच फुलपाखराचा समावेश आहे. विशेष म्हणजे या फुलपाखराच्या अळ्या फक्त कोवळी पानेच खातात, त्यामुळेच याला मायनर पेस्ट (फारसा उपद्रव नसलेला) म्हणूनच गणले जाते. शेतकरीसुद्धा याला शत्रू समजत नाहीत.

ब्लू मोरमॉन हे फुलपाखरू तर संत्रावर्गीय वनस्पतीच्या पेस्टच्या यादीतसुद्धा नाही. या फुलपाखराची खाद्य वनस्पती ही जंगली निंबू, जंगली संत्रा इत्यादी प्रकारातील जंगलातील खाद्य वनस्पती असून ब्लू मोरमॉनच्या अळ्या या वनस्पतीची पाने खाऊन जगतात. हे फुलपाखरू जंगलात आढळत असून शेतात आढळत नाही.

पान ३ वर...

पान २ वरून...

आपला राज्य पक्षी हरियल शेतीतील धान्य खातो. म्हणून काय आपण त्याला पेस्ट म्हणतो? नक्कीच नाही! आपला राष्ट्रीय पक्षी मोर काही भागात शेतातील पिक खातो. आपण त्याला पेस्ट समजत नाही! ब्लू मोरमॉन हे फुलपाखरू तर संत्र्याच्या बागेतसुद्धा सापडत नाही. हे फुलपाखरू पश्चिम घाटात व मुंबईमध्ये सामान्यपणे आढळते. पण तिकडे कुठे संत्र्याच्या बागा आहेत? विदर्भात तसे ते दुर्मिळच आहे व मला ते अजूनपर्यंत संत्र्याच्या बागेत सापडले नाही. त्यामुळे राज्य फुलपाखरू हे संत्रावर्गीय वनस्पतींसाठी घातक आहे, ही भीती निराधार आहे!

जगभरात फुलपाखरांया १७८२० इतक्या प्रजाती असून भारतात त्यांपैकी १५१० इतक्या प्रजाती आढळतात. महाराष्ट्रात आतापर्यंत २४० ते २५० प्रजातींची नोंद असून यापैकी जास्त प्रजाती ह्या सह्याद्री पर्वत रांगेत तथा गडचिरोली, चिखलदरा यासारख्या काही सदाहरित जंगलाच्या पट्ट्यामध्ये आढळत असून महाराष्ट्राच्या इतर प्रदेशात व विदर्भासारख्या शुष्क पानगळी प्रकारची जंगले असलेल्या प्रदेशात १००-१५० प्रजाती आढळतात.

फुलपाखरू हा परिसंस्थेतील महत्त्वाचा घटक असून अन्न साखळीतील महत्त्वाचा घटक आहे. परागीकरणामध्ये फुलपाखरांची महत्त्वाची भूमिका असून, फुलपाखरे ही परिसंस्था व अधिवासातील बदलाचे निदर्शक असतात. जंगलाची समृद्धी ही फुलपाखरांच्या अस्तित्वावर अवलंबून असते. त्यामुळे पक्ष्यांप्रमाणेच फुलपाखरांच्याही अभ्यासाला विशेष महत्त्व आहे.

महाराष्ट्राने फुलपाखरू घोषित करून निसर्गातील या छोट्याशा घटकाला महत्त्व प्राप्त करून दिले. त्यामुळे त्यांच्या संवर्धनाकडे लक्ष वेधले जाऊन त्यांचेविषयी तसेच, पर्यावरण संवर्धनाविषयी जनजागृतीसुद्धा होण्यास मदत होईल.

– डॉ. जयंत वडतकर

*सचिव, डब्ल्यू.इ.सी.एस. तथा मानद वन्यजीव रक्षक, अमरावती.*

डॉ. विद्याधर ओगले यांनी ब्लू मोरमॉनला 'नीलपरी' असे नाव सुचविले आहे. त्याचे मराठी नाव निश्चित करताना या नावाचाही विचार व्हावा. – संपादक.

# भारतातील पक्षी अभयारण्य क्षेत्रफळ

भारत हा जैवविविधतेने संपन्न असा देश म्हणून ओळखला जातो. ह्या जैवविविधतेमध्ये भारतात आढळणारे अनेक पक्षीही समाविष्ट आहेत. जगात आढळणाऱ्या सुमारे १०,००० पक्षी प्रजातींपैकी भारतात जवळपास १,२०० प्रजाती आढळतात. त्यानुसार पक्षीविविधतेत भारताचा पहिल्या १० देशांमध्ये क्रमांक लागतो. अनेक पक्ष्यांचा निवास असलेली पक्षी अभयारण्ये त्या दृष्टीने महत्त्वाची आहेत.

भारतातील एकूण पक्षी अभयारण्ये – ११६

एकूण पक्षी अभयारण्याखालील क्षेत्रफळ (चौरस कि.मी.) – २३,१८६

(राज्यानुसार पक्षी अभयारण्याखालील क्षेत्रफळ (चौरस कि.मी.) उतरत्या क्रमाने)

| क्र. | राज्य/केंद्रशासित प्रदेश | क्षेत्रफळ (चौरस कि.मी.) | पक्षी अभयारण्ये (संख्या) |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र | ८,९५४ | ४ |
| २ | राजस्थान | ३,३४४ | ३ |
| ३ | आंध्रप्रदेश | २,६१७ | ८ |
| ४ | ओडिशा | २,२६८ | ४ |
| ५ | गुजरात | १,३५० | १० |
| ६ | मध्य प्रदेश | १,१२८ | ४ |
| ७ | अंदमान आणि निकोबार | ८५८ | १२ |
| ८ | हिमाचल प्रदेश | ६३२ | ५ |
| ९ | पश्चिम बंगाल | ४०८ | ५ |
| १० | अरुणाचल प्रदेश | ३७२ | ३ |
| ११ | जम्मू काश्मिर | २८४ | ४ |
| १२ | कर्नाटक | २७२ | ८ |

| क्र. | राज्य/केंद्रशासित प्रदेश | क्षेत्रफळ (चौरस कि.मी.) | पक्षी अभयारण्ये (संख्या) |
|---|---|---|---|
| १३ | तमिळनाडू | १९० | १३ |
| १४ | उत्तर प्रदेश | १५० | १२ |
| १५ | आसाम | ११० | ५ |
| १६ | पंजाब | ८६ | १ |
| १७ | बिहार | ८० | ६ |
| १८ | मणिपूर | ४० | १ |
| १९ | केरळ | २९ | ३ |
| २० | झारखंड | ६ | १ |
| २१ | हरियाणा | ६ | २ |
| २२ | गोवा | २ | १ |
| २३ | चंदिगड | ० | १ |
| | एकूण | २३,१८६ | ११६ |

*(स्रोत : संकेतस्थळ – १) केंद्रिय वने, पर्यावरण व हवामान खाते, २) विकिपिडिया)*

# सांगली शहरातील कल्पवृक्ष (नारळ) आणि पक्षी

शाळेत नारळाला कल्पवृक्ष का म्हणतात, हे आम्हाला शिकविले होते. त्यात झाडाच्या प्रत्येक भागापासून माणसाला काय मिळते याचे वर्णन होते. करवंटीपासून बटणे बनवतात, पण अशी बटणे मी आजपर्यंत पाहिली नाहीत. या वृक्षाचा निसर्गातील इतर घटकांना कोणता उपयोग होतो, याचा उल्लेख नव्हता. आजही त्यात बदल नसावा.

सांगली शहराचे आणि नारळाच्या झाडांचे नाते फार वेगळे आहे. शाळेत शिकविल्याप्रमाणे नारळाच्या लागवडीस हलकी जमीन, उष्ण व दमट हवामान आणि भरपूर पाऊस लागतो. यातले काहीही सांगलीत नाही. पण सांगलीत असलेल्या एकूण झाडांपेक्षा नारळाची झाडे जास्त आहेत. माझ्याच कॉलनीतील वीस घरांच्या आवारातील नारळाच्या झाडांची संख्या ५३ आहे. सांगलीला लागणाऱ्या नारळाची गरज सांगलीतील उत्पन्नातूनच भागते, असे म्हणतात.

सांगलीचा आणि कल्पवृक्षाचा संबंध सांगली संस्थान झाल्यापासून सुरू झाला. संस्थानचे संस्थापक थोरले चिंतामणराव पटवर्धन यांचे कोकणाशी असलेले नाते इथे महत्त्वाचे आहे. संस्थानची स्थापना १८१८ साली झाली आणि स्वातंत्र्याबरोबर संस्थान प्रजासत्ताकात विलीन झाले. दरम्यानच्या काळात वृक्षप्रेमी संस्थानिकांनी आमराई नावाचे बोटॅनिकल गार्डन विकसित केले. तसेच शे-पाचशे वृक्ष असलेली नारळाची बाग लावली. ती बाग तात्यासाहेबांचा मळा म्हणून प्रसिद्ध आहे. यातून प्रेरणा घेऊन सांगलीच्या नागरिकांनी मोठ्या संख्येने नारळाची झाडे लावली. काही शेतकऱ्यांनी नारळीच्या बागा लावून व्यापारी उत्पादनाचा प्रयोगही केला.

**पक्षी आणि वृक्ष**

हे नाते एकमेकाला पूरक आहे. वृक्ष पक्ष्यांना अन्न, निवारा पुरवितो तेव्हा पक्षी परागीभवन, बीज प्रसारण झाडाला लागणारी कीड यापासून रक्षण अशी कामे करतो.

नारळाचे झाड पक्ष्यांना फारच कमी प्रमाणात अन्न म्हणून उपयोगी पडते. नारळाला जेव्हा फुले येतात तेव्हा त्या फुलांना चाखणारा शिंजीर हा एकमेव पक्षी इथे दिसतो. याखेरीज त्यावर असणारे कीटक खाण्यासाठी स्थलांतर करून येणारे वॉर्बलर (वटवटे) दिसतात. आणखी एक शिकारी पक्षी या झाडावरून अन्न मिळवितो.

**ओरिएन्टल हनीबझर्ड – मधुबाज**

खरंतर हा जंगलात किंवा मोठमोठे वृक्ष असणाऱ्या प्रदेशात आढळणारा पक्षी आहे. याची संख्या सांगलीत लक्षणीय आहे. इतकेच नव्हे तर ते इथे प्रजनन करतात. या पक्ष्याचे अन्न लहान प्राणी, पक्षी आणि नावाप्रमाणे मधमाश्यांची पोळी. मधमाश्यांच्या पोळ्यातील ज्या भागात त्यांची अंडी, अळ्या असतात तो भाग हे पक्षी खातात. याचा नारळाच्या झाडाशी काय संबंध हा प्रश्न पडतो. मधमाश्यांची पोळी मोठे वृक्ष, इमारती, पुलाच्या कमानींना लागलेली दिसतात. मोठे वृक्ष इतिहासजमा झालेत. इमारतीवर अशी पोळी आता करू दिली जात नाहीत. तेव्हा राहता राहिला एक पर्याय म्हणजे नारळाचे झाड. मधमाश्या या झाडाच्या पानाला (झावळी) खालून पोळे बांधतात. सांगलीत ही झाडे मुबलक म्हणून मधमाश्यांची पोळी ही खूप आढळतात. साहजिकच मधुबाज येथे स्थिरावलेला आहे.

**निवारा**

नारळाचा वृक्ष पक्ष्यांना रातथारा आणि घरटे करण्यासाठी जागा अगर सामुग्री पुरवितो. कमी उंचीच्या वृक्षांवर मैना, दयाळ, भांगपाडी मैना हे पक्षी घरटी करताना दिसतात. घार, काळा शराटी, रेडनेप्ड आयबीस हे पक्षीसुद्धा घरटी करण्यासाठी नारळाच्या झाडाचा वापर सर्रास करतात.

नारळाच्या पानाचे तंतू बया (विव्हर बर्ड) घरटे करण्यासाठी वापरतात. नारळाचे केसर तंतू (फायबर) घरटे बांधणारे सर्वच पक्षी वापरतात. नारळाचे झाड वठले म्हणजे त्याचे सरळसोट खोड अनेक वर्षे टिकून राहते. सांगली भागात त्याचा कोणत्याही कारणांसाठी वापर होत नाही. खोड काढण्याचा खर्च आणि विल्हेवाट लावायची व्यवस्था यापेक्षा ते तसेच ठेवणे पसंत केले जाते. अशा खोडांचा वापर होल नेस्टिंग (बिळात/सापटीत) बर्ड प्रामुख्याने करतात. याची सुरुवात तांबट किंवा सुतार या पक्ष्याने खोडावर बीळ खोदण्याने होते. मैना, टीट, धनेश, किर पोपट, तुहीया पोपट, पिंगळा हे पक्षी घरटे म्हणून त्याचा वापर करतात.

सांगली शहरात नारळाच्या खोबऱ्याखेरीज इतर भागांचा किती वापर होतो याबद्दल शंकाच आहे. कारण नारळाचे उपयुक्त भाग खोड, झावळी, सोपट, केसर यांचे ढीग कचराकुंडीत दिसत असतात. नारळाच्या वृक्षाचा त्रास अनेक कारणांनी नागरिकांना होतो. फळे आणि पाने (झावळी) पडून फार मोठी मोडतोड होते. त्यात हे झाड नेहमी कुंपणालगत लावले जाते. नारळ काढणे व झाडाची निगा यासाठी माणसे मिळत नाहीत. नारळाच्या सावलीत इतर फुलझाडे नीट येत नाहीत. सबब लोकांचा कल तो वृक्ष काढण्याकडे असतो. अशा लोकांना आम्ही वरचा त्रास देणारा भाग काढून टाकण्याचा सल्ला देतो. त्यामुळे राहिलेले खोड घरटी करण्यासाठी पक्षी वापरतात आणि पक्ष्यांना घरटे करण्याची उत्तम जागा तयार होते.

– शरद आपटे

*मोबा. ९८९०३८४४००, e-mail : aptesharad@yahoo.co.in*

## पक्षीमित्रांना आवाहन

आपली पक्षीनिरीक्षणे, पक्षीअभ्यास प्रकल्प, पक्ष्यांचे प्रथम दर्शन, शास्त्रीय पेपर इत्यादी पाठवावे. पक्षीमित्रमध्ये प्रसिद्ध केले जाईल. लिखाण हाती लिहून, टाईप करून ई-मेलने pakshimitra@gmail.com वर अथवा पोस्टाने महाराष्ट्र पक्षीमित्र, ११, युनायटेड पार्क, मार्कंडी, चिपळूण या किंवा संपादकांच्या पत्त्यावर पाठवावे.

## सालिम अलींच्या १२०व्या जन्मदिवस वर्षी गिधाड गणनेचा संकल्प

'सह्याद्री निसर्ग मित्र' ही संस्था 'सी.इ.पी.एफ.' यांच्या मदतीने आणि वन विभागाच्या मार्गदर्शनाखाली कोकण परिसरात गिधाड संवर्धनावर काम करीत आहे. कोकण परिसरात पांढऱ्या पाठीची आणि लांब चोचीची गिधाडे अशा २ प्रजाती आढळतात. रायगड जिल्ह्यातील माणगावपासून गोवा सीमेपर्यंत वनविभागाच्या मदतीने केलेल्या सर्वेक्षणानुसार श्रीवर्धन, चिरगाव येथे पांढऱ्या पाठीची तर पाटणूस, रानवडी, नाणेमाची, विहाळी येथे लांब चोचीच्या गिधाडांच्या वसाहती आढळल्या आहेत. ह्या सर्व जागा रायगड–रत्नागिरी जिल्ह्यांच्या सीमाभागात आहेत. विहाळी हे एकच गाव रत्नागिरी जिल्ह्यात तर उर्वरित गावे रायगडमध्ये आहेत. सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्याच्या इतर भागात गिधाडांच्या वसाहती नाहीत.

गिधाडांना मिळणाऱ्या खाद्य पुरवठ्याचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने सह्याद्रीने संपूर्ण कोकण परिसर ३० कि.मी. त्रिज्येचे दहा विभाग करून स्थानिकांच्या मदतीने सर्वेक्षण केले. एकूण ११४ ठिकाणी गुरे उघड्यावर टाकली जातात. पण त्यापैकी फक्त ९ ठिकाणी नियमितपणे गिधाडे दिसतात. गिधाडांच्या वसाहतींपासून १५–२० कि.मी.च्या परिसरात ह्यातील एकतरी जागा येते.

नैसर्गिक स्थितीतील गिधाड संवर्धन–संरक्षणाचे भारतात इतर ठिकाणीही प्रकल्प आहेत. ह्या बरोबरच वनविभाग आणि बी.एन.एच.एस.तर्फे ५ ठिकाणी गिधाड पैदास केंद्रे उभी केली गेली आहेत. गिधाडांची एवढी बिकट परिस्थिती असूनसुद्धा अजूनही संपूर्ण भारतात गिधाडांची गणना झालेली नाही. उत्तर भारतात बी.एन.एच.एस. तर्फे अशी गणना घेतली गेली होती आणि २०१६ ची पुढील गणनाही फक्त उत्तर भारतापुरतीच सीमित राहील. भारताबरोबरच 'सेव्हिंग एशियन व्हल्चर्स फ्रॉम एक्स्टिन्क्शन' तर्फे गिधाडांच्या संवर्धनाचे प्रयत्न पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश, म्यानमार, कंबोडिया येथे केले जात आहेत. बांगलादेशमध्ये गिधाड गणना २०१६ मध्ये होणार आहे, तर इतर सर्व देशांमध्ये गिधाड गणना झाली आहे.

ह्या पार्श्वभूमीवर 'सह्याद्री निसर्ग मित्र'तर्फे महाराष्ट्रात गिधाड गणना घेण्याचे ठरविले आहे. महाराष्ट्र पक्षीमित्रांचे जाळे ह्या कामासाठी नक्कीच महत्त्वाचा दुवा ठरेल. ही गणना सर्वांसाठी खुली राहील.

सह्याद्री निसर्ग मित्र तर्फे नोंदविलेल्या वसाहतींच्या जागांचे सर्वेक्षण वेळोवेळी केले जाईल. ज्या व्यक्ती जिल्हा समन्वयक म्हणून काम करू इच्छितात त्यांनी सावंतवाडीतील पक्षीमित्र संमेलनात आपले नाव नोंदवावे. ह्या सर्वेक्षणासाठी वापरण्यात येणारे मोबाईल ॲप आणि सर्वेक्षणाची इतर माहितीही संमेलनात दिली जाईल. ह्या गणनेत अधिकाधिक लोकांना कसे सहभागी करून घ्यावे, ह्याच्या कल्पना सह्याद्री निसर्ग मित्रकडे sahyadricpn@gmail.com वर जरूर कळवाव्यात.

२०१६ साली सालिम अलींच्या जन्मदिवसाला १२० वर्षे पूर्ण होत आहेत. ह्या वर्षी गिधाड गणनेचे महत्त्वाचे काम पूर्ण करण्यास सर्वजण मदत करतील असा विश्वास सह्याद्री निसर्ग मित्र संस्थेला वाटतो.

– भाऊ काटदरे.

## देशव्यापी गणनेत ५१४ प्रजातींच्या पक्ष्यांची नोंद

पुणे : देशव्यापी डॉ. सालीम अली पक्षीगणनेत २२ राज्यांमधून सुमारे १५ हजार ६३८ निरीक्षणे नोंदविली गेली. यात जवळपास साडेपाचशे ठिकाणांहून ५१४ प्रजातींच्या पक्ष्यांची नोंद झाली. यात अतिसंकटग्रस्त पक्ष्यांच्या यादीतील पांढऱ्या पाठीचे गिधाड आणि संकटग्रस्त पक्ष्यांच्या यादीतील चार पक्ष्यांची निरीक्षणेही नोंदविण्यात आली.

डॉ. अली यांच्या जयंतीचे औचित्य साधून बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (बीएनएचएस) आणि बर्ड काउंट इंडिया यांच्यातर्फे देशव्यापी 'डॉ. सालीम अली पक्षीगणना' १५ नोव्हेंबरला करण्यात आली. यात जवळपास २२ राज्यांमधील २८४ पक्षीप्रेमींनी सकाळी सहा ते नऊ वाजेपर्यंत पक्षीनिरीक्षण केले. त्यातील १०४ पक्षीप्रेमींनी त्यानंतरही पक्षीनिरीक्षण सुरू ठेवले. केवळ ७३ पक्षीनिरीक्षकांनी दिवसभर निरीक्षण केले. त्यामध्ये एकूण ५१४ पक्ष्यांच्या प्रजाती आढळल्या असून त्यापैकी ३० प्रजाती या संकटग्रस्त यादीतील आहेत. गणनेत अतिसंकटग्रस्त पक्ष्यांच्या यादीत असणारी पांढऱ्या पाठीची गिधाडे दिसून आली, तर धोक्याच्या यादीतील काळ्या पोटाचा सुरव (ब्लॅक बेलीड टर्न), पांढरे गिधाड (इजिप्शियन व्हल्चर), मोठा जलरंक (ग्रेट नोट) आणि नेपाळी गरूड (स्टेपी इगल) हे पक्षी दिसून आले. याबद्दल बीएनएचएसचे संचालक डॉ. दीपक आपटे म्हणाले, ''पक्ष्यांच्या जगताशी सर्वसामान्य नागरिकांचे नाते जोडले जावे, या उद्देशाने ही देशव्यापी गणना करण्यात आली. पक्षीनिरीक्षणात जास्तीत जास्त लोकांनी सहभागी व्हावे याबरोबरच पर्यावरणप्रेमींना पक्षीनिरीक्षणाचे दूत बनविण्याचा हेतू आहे. या निरीक्षणात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर होता. राज्यातील जवळपास १२३ पक्षीनिरीक्षकांनी सहभाग नोंदविला. त्याखोलोखाल केरळ (५९), कर्नाटक आणि तमिळनाडू (४०) येथील निरीक्षकांचा सहभाग होता.''

– डॉ. राजू कसंबे

### देणगी

| क्र. | नाव | पत्ता | रक्कम | दिनांक | पावती क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. चैतन्य गोखले | ठाणे | ₹ १५,०००/- | २८ सप्टेंबर २०१५ | २३२९ |

# पाच घरट्यांतून आठ पिल्लांना वाचविण्यात यश
## तणमोर संवर्धनासाठी पारधी समाजाला साद!

मुंबई : फासेपारधी समाजाच्या कपाळावर अट्टल गुन्हेगार असल्याचा शिक्का ब्रिटिशकाळापासून बसलेला. समाजाने आणि सरकारनेही या जमातीवर वर्षानुवर्षे हा कलंक लावला होता. आता मात्र या समाजाला मुख्य प्रवाहामध्ये घेत केंद्र सरकारने 'तणमोर पक्षी संवर्धना'ची मोहीम हाती घेतली आहे.

तणमोर ही प्रजाती अतिदुर्मिळ गटात मोडणारी. जगात त्यांची संख्या बोटावर मोजण्याइतकी, महाराष्ट्रात तर हे पक्षी सापडतच नाही, असा ठोस दावा केला जात होता. अकोला जिल्ह्यातील फासेपारधी समूहाने तब्बल शंभर वर्षांनी तणमोराचे पहिले घरटे शोधून काढले तेव्हा पर्यावरणप्रेमींना आश्चर्याचा धक्काच बसला. गुन्हेगार म्हणून फासेपारधी समाजाच्या प्रगतीचा प्रत्येक मार्ग बंद करण्यात आला होता. परंपरागत उपजीविकेसाठी शिकारीचा व्यवसाय करत हा समूह अस्तित्व टिकविण्याची धडपड करीत होता.

अवघी तीनच बोटे असलेल्या तणमोराचा अधिवास झाडातील घरट्यांमध्ये नसून तो गायीम्हशींच्या चारा क्षेत्रात असतो. मात्र या चाऱ्यासाठी पशुपालक हा अधिवास मोडीत काढतात. ब्रिटिशकाळातही तणमोराच्या शिकारीचे असंख्य दाखले दिसतात. त्यामुळे तणमोर प्रजाती नष्ट झाली, याच निष्कर्षाप्रत पक्षी संवर्धक आले होते. फासेपारधी समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन नकारात्मक असताना 'संवेदना' या जैवविविधता जपणाऱ्या संस्थेने फासेपारध्यांकडे असलेल्या परंपरागत ज्ञानाचा उपयोग करून घेण्याचे ठरविले. फासेपारध्यांच्या तांडा पंचायत तयार करून आठ वर्षांत तणमोराच्या पाच घरट्यांतून आठ पिल्लांना वाचविण्यात फासेपारधींना यश आले! या कामासाठी आंतरराष्ट्रीय जैवविविधता परिषदेमध्येही त्यांना 'इंडिया बायोडायव्हर्सिटी' पुरस्काराने गौरविण्यात आले.

अकोला जिल्ह्यातल्या वडाळा पारधी तांड्याने तणमोरांची शिकार बंद करून माळरानावर बकऱ्या पाळण्याचा निर्णय घेतला. तणमोरांच्या अधिवासातले सूक्ष्म बारकावे त्यांना माहीत होते. तणमोर पक्ष्याचा नर जुलै महिन्याच्या सुरुवातीला एका ठराविक चाराक्षेत्रात पिंगा घालू लागतो, त्यावेळी मादीच्या प्रजननाचा काळ जवळ असल्याचे संकेत असतात. या पिलांसह तणमोर पक्ष्यांच्या घरट्यांचे संवर्धन करण्यासाठी आता फासेपारधी, केंद्रीय वन-पर्यावरण विभागाच्या मदतीने तणमोर संवर्धनाच्या मोहिमेमध्ये एकत्र आले आहेत.

('महाराष्ट्र टाइम्स'वरून)

---

## Maharashtra Pakshi Mitra Sanstha, Chiplun

Reg. No. MAH 285/98

**Receipts & Payment Account**

Date : 27/08/2015, Place : Chiplun — For the year ended 31st March 2015

| Receipt | | Amount | Payment | | Amount |
|---|---|---|---|---|---|
| **To Opening Balance** | | 77,349.80 | **By Exps. on Object of Trust** | | 1,02,554.00 |
| Cash | 26,461.80 | | 12A Registration Fees | 15,000.00 | |
| Bank of Maharashtra A/c No.2017 | 14,720.00 | | 80G Registration Fees | 12,000.00 | |
| Chiplun UR Bank A/c No. 96802 | 36,168.0 | | Domain Name and Hosting renewal charges | 14,700.00 | |
| | | | Bank charges | 58.00 | |
| **To Donation** | | 1,01,900.00 | Administration Exps. | 22,500.00 | |
| Donation | 56,450.00 | | Postage & Telegram | 7,512.00 | |
| Magazine Donation | 32,450.00 | | Postage & Courier | 1,287.00 | |
| Prakash Gole Pakshi Savardhan Nidhi | 13,000.00 | | IBCN-BNHS Magazine Fund | 17,101.00 | |
| | | | Magazine Exps. | 11,570.00 | |
| | | | Stationary Exps. | 826.00 | |
| **To Life Membership Fees** | | 38,000.00 | **By Audit Fees** | | 1,500.00 |
| **To Bank Interest** | | 1,823.00 | **By TDS 15-16** | | 5,000.00 |
| | | | **By Closing Balance** | | 1,10,018.80 |
| | | | Cash | 57,065.80 | |
| | | | Bank of Maharashtra A/c No.2017 | 48,506.00 | |
| | | | Chiplun UR Bank A/c No. 96802 | 4,447.00 | |
| **Total** | | **2,19,072.80** | **Total** | | **2,19,072.80** |

Examined & correct as per information & books of accounts provided.
V.K.Releker & Co. (Chartered Accountant - Mem. No. 38511/86)

# सेल्फी विथ सर डेव्हिड एटेनबरो

'व्हीटली पुरस्कार' (Whitley Award) अर्थात 'ग्रीन ऑस्कर' पुरस्काराच्या निमित्ताने मला सर डेव्हिड एटेनबरो (Sir David Attenborough) यांना भेटायला मिळू शकते, हे कळल्यावर खरं तर मला हा पुरस्कार घोषित झाल्याच्या आनंदापेक्षाही जास्त आनंद झाला होता. गेली अनेक वर्षे सर डेव्हिड एटेनबरो 'ग्रीन ऑस्कर' पुरस्कारासमवेत जोडले गेले आहेत. डेव्हिड एटेनबरो म्हणजे जागतिक वन्यजीव माहितीपट क्षेत्रातील चक्क देवच. १९५२ साली त्यांनी बी.बी.सी.मध्ये टेलिव्हिजन डिपार्टमेंटमध्ये काम सुरू केले. त्यानंतर ते १९६५ साली बी.बी.सी.चे कंट्रोलर म्हणून नेमले गेले. पण १९७९ साली बी.बी.सी. निर्मित 'लाइफ ऑन अर्थ' या माहितीपट मालिकेने या क्षेत्रात नवे पर्वच सुरू केले, याचे बरेचसे श्रेय सर एटेनबरोंना जाते. त्यानंतर एटेनबरोंनी अनेक महत्त्वाच्या माहितीपटांसाठी संपूर्ण पृथ्वी पालथी घालत बरेच काम केले. त्यांच्या आवाजाने संपूर्ण जगाला वन्यजीवांच्या रहस्यमयी जीवनाची गोडीच नाही तर वेड लागले. अशा सर डेव्हिड एटनबरोंना 'ब्रिटनची राष्ट्रीय संपत्ती' असे संबोधले जाते आणि ब्रिटनमधील आतापर्यंतच्या १०० थोर व्यक्तींमध्ये



त्यांचा समावेश होतो. या महान व्यक्तीसोबत काही वेळ घालवायला मिळणार या आनंदात असताना मला आणखी एक सुखद धक्का बसला. अगदी छप्पर फाडके म्हणावे, तसे दस्तुरखुद्द सर डेव्हिड एटेनबरो माझ्यावरील 'ग्रीन ऑस्कर' पुरस्काराच्या निमित्ताने बनवल्या जाणाऱ्या लघुपटाला त्यांचा 'दैवी' आवाज देणार आहेत, हे समजले. ज्यांच्या आवाजाने माझे संपूर्ण आयुष्य बदलून गेले त्यांचा आवाज माझ्यावरील लघु माहितीपटाला मिळणार ही गोष्ट किती विलक्षण आहे, हे केवळ मीच समजू शकतो. त्यांच्या आवाजाने माझे संपूर्ण बालपण भारावून गेले होते. आयुष्यात आजपर्यंत अतोनात प्रेम केलेल्या सगळ्या गोष्टी कुठल्याना कुठल्या मार्गाने परत येतात, हा माझा अनुभव इथेही खरा ठरला. मनातल्या मनात मी 'आता आनंदाने मरायला मोकळा झालो' असेही म्हणालो.

लंडनला पोहोचल्यानंतर जाणवले की ब्रिटिश लोकांना डेव्हिड एटनबरोंचे एक वेडच आहे. तिथल्या नॅचरल हिस्ट्री म्युझियममध्ये एटेनबरोंचे सर्व काम उपलब्ध आहे. त्यांच्या बऱ्याच फिल्म्स सहज विकत मिळतात. मुलांसाठी त्यांचे मुद्रित केलेले दृक्श्राव्य कार्यक्रम होतात. वयामुळे सध्या एटेनबरो फार कमी वेळा भेटतात. त्यामुळे त्यांचे प्रत्यक्ष दर्शन खूपच दुर्मिळ झाले असल्याचेदेखील समजले. या पार्श्वभूमीवर माझ्या एटेनबरोंच्या भेटीला माझ्या दृष्टीने एक वेगळेच महत्त्व प्राप्त झाले. अखेर 'ग्रीन ऑस्कर' पुरस्कार सोहळ्याची ती संध्याकाळ आली. आम्हाला त्यांना भेटता यावे, म्हणून कार्यक्रम स्थळी सर एटेनबरो काही वेळ आधीच आले होते. त्यांना पाहिल्यानंतर अर्थातच पहिली प्रतिक्रिया होती – 'वॉव'. ते आजही प्रत्यक्षात तसेच दिसतात जसे ते टी.व्ही.मध्ये त्यांच्या अनेक फिल्म्समध्ये दिसतात. व्हिटली फाउंडेशनचे श्री. एडवर्ड व्हिटली यांनी त्यांना माझी ओळख करून देताना माणसांचे डॉक्टर आणि माळढोकचे संवर्धक अशी करून दिली. यावर लगेचच सर एटनबरोंनी 'नाही नाही ते माळढोकचे डॉक्टर' आहेत अशी सूचक टिप्पणी केली. मग तिथे एकच हशा पिकला. तिथेच माझी बरीच भीती गळाली. मला त्यांचे माझ्यावर असणारे ऋण त्यांना बोलून दाखवायचे होते. कारण फेडता न येणारे ऋण केवळ बोलून दाखवता येते व त्याने माझ्या मनाला खूप बरे वाटणार होते. मी म्हणालो, 'तुमच्या आवाजाने माझे आयुष्य बदलून गेले. मी 'वन्यजीव वेडा झालो'. त्यावर लगेचच माझ्या खांद्यावर हात ठेवत त्यांचे उत्तर आले, 'डॉक्टर तुमच्यात वेड आधीपासून होते. केवळ ते व्यक्त करण्यास उद्युक्त करायला मी निमित्तमात्र झालो व याचा मला आनंद आहे.' मी म्हणालो, 'भारतात लोक तुमचे वेडे आहेत.' यावर सर एटेनबरो म्हणाले, 'मला भारताचे विलक्षण आकर्षण आहे व मी कुंभमेळ्यात अनेक वर्षांपूर्वी पवित्र स्नान घेणाऱ्या लाखो लोकांच्यामध्ये जाऊन एकदा चित्रीकरण केले होते.' अशा आठवणीही त्यांनी सांगितल्या. सस्तन प्राण्यांवरील एका माहितीपट शृंखलेतील 'संधिसाधू सस्तन प्राणी' या भागाच्या अगदी शेवटी माणूस हा या पृथ्वीवरील सर्वात यशस्वी संधीसाधू सस्तन प्राणी आहे, हे सर एटेनबरो कुंभमेळ्यातील लाखो लोकांच्या मध्ये उभे राहून पटवून देत होते.

त्यांची 'प्लॅनेट अर्थ' ही माझी सर्वात आवडती माहितीपट मालिका आणि म्हणूनच त्याचा एक डी.व्हि.डी. सेट मी कार्यक्रमस्थळी सोबत ठेवला होता. संधी बघून मी त्यांची स्वाक्षरी घेण्यासाठी तो पुढे केला. त्यांनी लगेचच त्यावर स्वाक्षरी दिली. ही माझ्यासाठी एक अविस्मरणीय भेट ठरली. त्यानंतर त्यांनी माझ्या कामामुळे माळढोकबद्दल त्यांना अधिक माहिती मिळाल्याचे सांगून त्यांच्या अवस्थेबद्दल चिंता व्यक्त केली. तसेच, माझ्या पुढील कामासाठी शुभेच्छा दिल्या. माझी आता एकच इच्छा राहिली होती. ती म्हणजे त्यांच्या सोबत एक पर्सनल फोटो. हे जाणून श्री. एडवर्ड व्हिटली पटकन् पुढे आले व माझ्या हातातील मोबाईल घेत फोटोसाठी उभे राहायला सांगू लागले. इतक्यात माझ्या मनात एक गंमतीशीर कल्पना आली. ती म्हणजे डेव्हिड एटेनबरोंसोबत चक्क सेल्फी घेण्याची. मी पटकन् धाडस करून म्हणालो, 'सर, इफ यु डोन्ट माइंड, कॅन वी टेक अ सेल्फी?' माझे हृदय फुटून छातीतून बाहेर यायची वेळ आली होती. पण मग एक स्मित हास्य करत लगेचच ते म्हणाले, 'व्हाय नॉट, आय हॅव नॉट ट्राइड सेल्फी.' मी पटकन कसा बसा मोबाइल धरला. आम्ही दोघेही कॉलेजच्या सेल्फी-वेड्या मुलांप्रमाणे फ्रेममध्ये येण्यासाठी पोज दिली व मी थरथरणारे हात सांभाळत मोबाइल स्क्रीनवर टच केले. यावेळेस सर डेव्हिड एटेनबरोंनी छान 'मिलियन डॉलर' स्मितहास्य केले. 'ग्रीन ऑस्कर' पुरस्कार मिळण्याच्या आधीच मला आणखी एक पुरस्कार मिळाला होता व माझी लंडनवारी सार्थक झाली होती.

– डॉ. प्रमोद पाटील.

टपाल तिकिटांच्या दुनियेत

## सैबेरियन क्रौंच (Siberian Crane)

सैबेरियन क्रौंच हा स्थलांतरित पक्षी असून उत्तर तुर्कस्तान, आग्नेय रशिया व सायबेरिया येथे उन्हाळ्यात ते घरटी बांधतात आणि प्रजोत्पादन करतात. साधारणतः नोव्हेंबर महिन्यात आपल्याकडे येतात व मार्चच्या अखेरीस ते परत जातात. ह्या काळात भारतामध्ये भरतपूरच्या पक्षी अभयारण्यात त्याचे वास्तव्य असते. १९७० ते १९८० ह्या काळात ७५ ते ३३ अशा संख्येने भरतपूरमधील त्यांचे वास्तव्य कमी होत गेले. २००२ साली नाशिकच्या पक्षीमित्र मंडळाच्या सदस्यांना भरतपूर येथे सैबेरियन क्रौंच पक्ष्याची जोडी दिसली होती. त्यानंतर गेल्या दशकात एकही सैबेरियन क्रौंच भारतात आल्याची नोंद नाही.

सैबेरियन क्रौंच हा पक्षी चार फूट उंच व पांढऱ्या शुभ्र रंगाचा असतो. पण चेहरा तेवढा गुलाबी, लांब डौलदार मान आणि तांबडट पाय. त्याच्या पंखांच्या टोकाची पिसं काळी आहेत. ती उडताना स्पष्ट दिसतात. सहसा हे पक्षी नर-मादी अशा जोडीने दृष्टीस पडतात. त्यांच्या विविध हालचाली व जोडीने नर्तन करताना पाहताना भान हरपून जाते. हे पक्षी मनुष्यप्राण्यापासून दूरचे अंतर राखून असतात. आपला सुगावा लागला, की ते दूरवर उडून जातात. म्हणून त्यांचे दर्शन दुर्लभ असते.

भारतीय टपाल खात्यातर्फे सारस पक्ष्यांवरील आंतरराष्ट्रीय कार्यशिबिराच्या निमित्ताने रु.२.८५ किंमतीचे विशेष टपाल तिकिट प्रकाशित केले.





– रवींद्र वामनाचार्य

*मोबाईल*
*९८९०३९०५२७,*
*इ-मेल*
*r_wamanacharya@yahoo.co.in*


## गावकरी करणार वन्यजीव संरक्षण

हिमालयन नॅशनल पार्कमध्ये असलेल्या तीन खेड्यांतील गावकऱ्यांनी आपल्या बंदुका समर्पण करून त्या पार्कमधील वन्यजीवांना संरक्षण देण्याबरोबरच जवळच्या सेंज अभयारण्यातील वन्यजीवांचेही संरक्षण करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यासाठीची शपथ त्यांनी ब्रह्मदेवतेच्या पालखीसमोर घेतली.

या खेड्यांतील प्रत्येक दुसऱ्या घरातून बंदुका सांभाळल्या जात होत्या.

अभयारण्यात वा जवळपास राहणाऱ्या गावकऱ्यांनी निश्चय केला तर वन्यजीव संरक्षण चांगल्या तऱ्हेने होईल यात शंका नाही.

– पी.ए.अपडेटवरून.

सावंतवाडी येथे २३ व २४ जानेवारी २०१६ रोजी होणाऱ्या महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनासाठी सांगली येथील ज्येष्ठ पक्षीमित्र श्री. शरद आपटे यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली आहे.

कर्नाटकमधील बेल्लारी येथे गारपिटीमुळे २०० मीटर परिघातील १४ जातींचे १५७० पक्षी मारले गेले. विशेष म्हणजे हे सर्व पक्षी नारळाच्या झाडांवर बसलेले होते. पण जवळच्या पिंपळावर बसलेले सर्व पक्षी सुरक्षित राहिले होते.

## स्वागत नव्या सभासदांचे

**२६ ऑगस्ट २०१५ ते १५ नोव्हेंबर २०१५**


| क्र. | नाव | पत्ता | फोन नं. | e-mail |
|---|---|---|---|---|
| ८३२ | श्री. नंदकुमार बालकृष्ण देशपांडे | कोल्हापूर | ९४०४४१६२७२ | omnianand@yahoo.com |
| ८३३ | श्री. शिरीष मंची | कोयंबतूर | ९४४२२६०७१० | ediblenest@gmail.com |
| ८३४ | सौ. रेखा दिलीप बारी | जळगाव | ७८४१८४१३०० | - |
| ८३५ | प्रा. शिवाजी भिकाजी हुसे | औरंगाबाद | ९४०४०००३९८ | huseshivaji@yahoo.com |
| ८३६ | सौ. अर्चना नितीन अट्रावलकर | जळगाव | ९४२१५२१३६१ | aarchana72@gmail.com |
| ८३७ | श्री. अभय प्रल्हाद आखाडे | जळगाव | ८०८७४७९२२२ | abhayakhadbejib@gmail.com |
| ८३८ | श्री. किरण नारायण पाटील | जळगाव | ८८८८५६७३०० | patilk@gmail.com |
| ८३९ | श्री. भरत साहेबराव पाटील | जळगाव | ८८५७०८०७७७ | - |

# नाशिकच्या पक्षीमित्र मंडळाची वाटचाल


१९८१ साली पक्षीविषयक लेखन करणाऱ्या मित्रांना (कै.) प्रकाश गोळे यांनी तळेगाव येथे होणाऱ्या दोन दिवसांच्या मेळाव्यासाठी निमंत्रित केले होते. नाशिकहून श्री. दिगंबर गाडगीळ हे त्या मेळाव्यास गेले होते. मेळाव्यात भाषणे, स्लाइड शो, चर्चा, पक्षीनिरीक्षण सहल, इ. कार्यक्रम होते. उपस्थितांनी दरवर्षी अशा तऱ्हेने एकत्र जमावे असे ठरविले. ही होती महाराष्ट्रातील पक्षीमित्र संमेलनाची नांदी.

संमेलनाहून परत आल्यावर त्यांनी समानधर्म शोधून काढून नाशिक परिसरात पक्षी निरीक्षणास सुरुवात केली. नाशिकचे एक डॉक्टर पुराणिक, जे पूर्वी पक्षी शिकार करायचे, त्यांनी एका शनिवारी डॉ. ठकार, डॉ. सुळे व श्री. गाडगीळ यांना नांदूर मध्यमेश्वर येथे नेले. तेथील पाणपसाऱ्यावर पक्ष्यांची बेछूट हत्या होत होती. डाक बंगल्यावर मारून टांगलेल्या अनेक पक्ष्यांचे देह पाहून ते व्यथित झाले. नाशिकला परतल्यावर त्यांनी स्थानिक व मुंबईतील महाराष्ट्र टाइम्समध्ये एक पत्र लिहून नांदूर मध्यमेश्वर येथे शिकारबंदी करावी, अशी मागणी केली. त्याला पाठिंबा देणारी काही पत्रे प्रसिद्ध झाली. काही लोकप्रतिनिधींनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला. लवकरच सरकारने तिथे शिकारबंदी केली.

आपल्या एका पत्राने या कामाला चालना दिली, हे पाहून व्यापक स्वरूप देण्यासाठी त्यांनी पक्षीमित्र मंडळाची स्थापना केली. पुढच्याच वर्षी वनाधिकारी सुनील मित्रा यांच्या निमंत्रणावरून डॉ. सालिम अली नांदूर मध्यमेश्वरला भेट देण्यास आले असता त्यांच्या उपस्थितीत नाशिकला 'पक्षीमित्र मंडळा'चे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर पक्षीमित्र मंडळातर्फे पक्षीनिरीक्षण, वृत्तपत्रलेखन, स्लाइड शो, कार्यशाळा, प्रदर्शन असे उपक्रम सुरू झाले. मंडळाचे सभासद महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाला हजेरी लावू लागले. त्यातच त्यांनी सहाव्या संमेलनाचे निमंत्रण दिले. संमेलन २८ व २९ डिसेंबर १९८५ रोजी नाशिक रोडच्या मुक्तिधाम



*पक्षीमित्र मंडळाच्या औपचारिक उद्घाटन प्रसंगी सभास्थानी येताना डॉ. सालिम अली, सोबत डॉ. सुळे, डॉ. ठकार आणि श्री. गाडगीळ.*




परिसरात मोठ्या उत्साहाने साजरे झाले. त्यावेळी मंडळाचे अध्यक्ष होते डॉ. विनय ठकार, चिटणीस श्री. दिगंबर गाडगीळ. संमेलन भव्य झाले. त्याप्रसंगी आर्ट पेपरवर एक रंगीत स्मरणिका काढली होती. माझ्या माहितीप्रमाणे संमेलनानिमित्तची अशी ही पहिलीच स्मरणिका होती. स्थानिक वृत्तपत्रांनी पुरवण्या प्रसिद्ध केल्या होत्या. संमेलनाचे अध्यक्ष होते श्री. मारुती चितमपल्ली. तात्यासाहेब वि. वा. शिरवाडकर यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

संमेलनानंतर पक्षीमित्र मंडळाने जोमाने काम सुरू केले. दरवर्षी वन्यजीव सप्ताहाचे कार्यक्रम, आकाशवाणीवर भाषणे, चित्रकला स्पर्धा, हिवाळी पाणपक्षी गणना इ. धडाक्याने होत होते.

संमेलनानंतर गाडगीळांची बदली झाल्यावर अध्यक्षपद डॉ. बालसुब्रमण्यम यांनी स्वीकारले. त्यांच्या काळात नांदूर मध्यमेश्वर संदर्भात एक सचित्र पुस्तिका काढण्यात आली. नांदूर मध्यमेश्वर येथे पक्षी अभयारण्य व्हावे, हा पाठपुरावा सुरू झाला. महापालिकेच्या वृक्षसमितीवर अध्यक्षांना स्थान मिळाले.

१९८९ मध्ये श्री. गाडगीळ नाशिकला परत आल्यावर साहजिकच अध्यक्षपद त्यांच्याकडे गेले. त्यांनी महाराष्ट्र पक्षी संघटनेत संघटक या नात्याने कामगिरी बजावली. वयाच्या सत्तरीनंतर त्यांनी अध्यक्षपदाची धुरा सी.ए. श्री. मधुकर जगताप यांच्याकडे दिली.

२००४ मध्ये नांदेड येथे २१वे पक्षीमित्र संमेलन झाल्यावर हा उपक्रम खंडित होतो की काय अशी परिस्थिती आली असता नाशिकच्या पक्षीमित्र मंडळाने पुढाकार घेऊन ही कोंडी फोडली व डिसेंबर २००८ मध्ये नांदूर मध्यमेश्वर येथे २२वे संमेलन आयोजित केले. त्या संमेलनाचे अध्यक्ष होते श्री. भाऊ काटदरे. उद्घाटनासाठी गुजरातचे ज्येष्ठ पक्षीतज्ज्ञ डॉ. लवकुमार खाचर हे आले होते.

त्यानंतर संमेलनाची वार्षिक परंपरा व्यवस्थितपणे चालू आहे.

नाशिकचे पक्षीमित्र मंडळ डॉ. श्रीश क्षीरसागर, अनिल माळी, रवी वामनाचार्य, नीता लेले यांच्या सहकार्याने कार्यरत आहे.

– मधुकर जगताप


९८२२०५७५०३

**(हा अंक नाशिकच्या पक्षीमित्र मंडळाने प्रायोजित केला आहे.)**

स्वागत

## पक्षी निरीक्षण : एक अनोखा छंद

'आपल्या भोवतीच्या पर्यावरणाचा समतोल सांभाळण्यासाठी पक्ष्यांचा अभ्यास महत्त्वाचा आहे' असे मनोगत डॉ. माधवराव चितळे यांनी सुरुवातीलाच व्यक्त केले आहे. पक्षी निरीक्षण छंद जोपासण्यासाठी पक्षी कुठे बघावेत, कसे बघावेत, कसे ओळखावेत असे प्रश्न नवीन पक्षी निरीक्षकांना पडू शकतात. म्हणून 'पक्षी निरीक्षण : एक अनोखा छंद' या डॉ. दिलीप यार्दी लिखित पुस्तिकेत पक्षी म्हणजे काय? पक्ष्यांची रचना, पक्ष्यांच्या चोची, पक्ष्यांच्या पायांचे प्रकार, पक्षी निरीक्षणाचे मंत्र, दुर्बिणीची आवश्यकता, पक्षी निरीक्षण करताना घ्यावयाची काळजी, काही महत्त्वाची पथ्ये/बाबी, पक्ष्यांच्या नोंदी कशा घ्याल? पक्ष्यांची उपयुक्तता, पक्षी संवर्धनासाठी उपक्रम अशा पक्ष्यांसंबंधित प्रश्नांची उत्तरे तसेच प्राथमिक स्वरूपाची माहिती पक्षी निरीक्षकांना तसेच अभ्यासकांना मिळेल.




*पक्षी निरीक्षण : एक अनोखा छंद*
*लेखक : डॉ. दिलीप यार्दी*
*मूल्य : रु.७५/-*


आर्ट कलर पेपरवर छापलेल्या या पुस्तिकेत ३९ पक्ष्यांची रंगीत प्रकाशचित्रे व १८ पूरक प्रकाशचित्रांचा समावेश आहे. या पुस्तिकेचे प्रकाशन एनव्हायरमेंटल रिसर्च फाउंडेशन ॲण्ड एज्युकेशनल ॲकेडमी या संस्थेने केले आहे. नवीन पक्षीनिरीक्षकांना पक्षी निरीक्षणातील शिस्त आणण्यासाठी व आवड-छंद वाढविण्यासाठी ही पुस्तिका निश्चितच उपयुक्त आहे.

– अनिल रतिलाल माळी, नाशिक.

## पक्षिजगत

नालासोपारा येथील आपले एक सभासद श्री. सचिन मेन यांनी लिहिलेले पुस्तक २३ जानेवारी २०१६ रोजी प्रसिद्ध होत आहे. पुस्तकात पक्षीविषयक १०० लेख असून २०० रंगीत प्रकाशचित्रे आहेत.

पुस्तकाची किंमत रु. ३९५/–
प्रसिद्धीपूर्व किंमत रु. २९५/–
पोस्टेजसह.
संपर्क : सचिन मेन ८४४६२४८८८४




Registered with the Registrar of Newspaper in India under serial No. MAHMAR/2012/51349

**Book Packet containing periodicals**

प्रति,

प्रेषक :
महाराष्ट्र पक्षीमित्र
११, युनायटेड पार्क, मार्कंडी,
चिपळूण, जि. रत्नागिरी – ४१५ ६०५
फोन : (०२३५५) २५३०३०
E-mail : pakshimitra@gmail.com
website : www.pakshimitra.org

**पक्षीमित्र**
संपादक : दिगंबर गाडगीळ
मूल्य ₹ ५/–
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : प्रिंटवेल, नाशिक
मुद्रक : एस्. व्ही. प्रेस – चिपळूण
फोन : (०२३५५) २५२३३०